परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/1859. **दिनांक :** २६/११/२०२५

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी शाखेतील प्रथम व द्वितीय वर्ष २०२४ पॅटर्न मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हिवाळी २०२५ सत्राचे परीक्षा अर्जाबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी शाखेतील प्रथम व द्वितीय वर्ष २०२४ पॅटर्न मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हिवाळी २०२५ सत्राचे परीक्षा अर्ज सुरू करण्यात आलेले होते. सदर परीक्षांचे अर्ज भरण्याच्या कालावधीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. उर्वरित तपशील व सूचना पत्र क्रमांक परीक्षा/छावता/१५५४, दिनांक १४/०९/२०२५ प्रमाणेच राहतील.

अभियांत्रिकी शाखेतील द्वितीय वर्ष २०२४ पॅटर्नचे हिवाळी सत्र २०२५ परीक्षेचे अर्ज भरताना ज्या विद्यार्थ्यांनी चुकीची शाखा निवड केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी त्वरित त्यांचे परीक्षा अर्ज रद्द करून घेण्यासाठी महाविद्यालयामार्फत खालील प्रमाणे माहिती भरून ईमेल करण्यात यावा आणि त्वरित नविन परीक्षा अर्ज भरण्यात यावा. तसेच अभियांत्रिकी शाखेतील प्रथम व द्वितीय वर्ष २०२४ पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेला असून संबंधित महाविद्यालयानी परीक्षा अर्ज कायम देखील केलेला आहे परंतु विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा केलेले नाही, अशा संबंधित सर्व विद्यार्थ्यांना कळवून त्यांचे परीक्षा शुल्क त्वरित अंतिम दिनांकाच्या आत भरून घ्यावे.

**मेल चा विषय – परीक्षा अर्ज रद्द करणेबाबत (अभियांत्रिकी शाखा प्रथम व द्वितीय वर्ष २०२४ पॅटर्न)**
**१. विद्यार्थ्यांचे नांव :** **२. PRN क्रमांक :**
**३. परीक्षा अर्ज क्रमांक :** **४. परीक्षा अर्ज का रद्द करावयाचे कारण :**

**परीक्षा अर्ज भरण्यासाठी पुरेसा कालावधी देण्यात आला असून यापुढे कोणतीही अतिरिक्त मुदतवाढ मिळणार नाही, याची संबंधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी. सुधारित कालावधी मर्यादा पुढीलप्रमाणे :–**

| विद्यार्थ्यांने परीक्षा अर्ज नियमित शुल्कासह भरण्याचा कालावधी | महाविद्यालय/ संस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा अंतिम दिनांक | विद्यार्थ्यांने विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/ संस्थेने विलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/ संस्थेने विलंब व अतिविलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने नियमित शुल्कासह परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| २६/११/२०२५ दुपारी ३.०० ते १/१२/२०२५ दुपारी २.०० पर्यंत | २/१२/२०२५ सायं ५.०० पर्यंत | — | — | — | — | ३/१२/२०२५ सायं. ६.०० पर्यंत |

**विशेष टीप** : अतिवर्षा आणि सद्यःस्थिती लक्षात घेऊन विलंब व अतिविलंब शुल्क आकारण्यात आलेले नाही. तरी आताची ही मुदतवाढ अंतिम मुदतवाढ समजून कार्यवाही व्हावी.

कळावे,

आपला,

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.